# 'तो' आत्महत्या करायला गेला अन् दोन वर्षांनी पालकांना सापडला 'हरवलेला' मुलगा !

**वृत्तसंस्था**

मुंबई, मंगळवार - दोन वर्षांपासून बेपत्ता असलेला उजयकुमार परमार (१९)) याने वांद्रे - वरळी सी लिंक येथे आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, त्याचं दैव बलवत्तर होतं म्हणूनच सी लिंकवर तैनात असलेल्या गार्डने त्याला समुद्रात उडी मारण्यापासून वाचविले आणि त्यानिमित्ताने पोलिसांच्या तपासातून बडोदा येथे राहणाऱ्या आई-वडिलांना आपला मुलगा परत मिळाला आहे. याप्रकरणी वरळी पोलीस पुढील तपास करत असून मुलाला आई - वडिलांच्या ताब्यात सोपविले जाईल, असे वरळी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुखलाला वरपे यांनी सांगितले. वरपे यांनी पुढे सांगितले की, २०१७ साली १७ वर्षांचा असताना उजयकुमारने बडोदा येथून पळ काढून मुंबई गाठली होती. तो बेपत्ता झाल्याने अपहरणाचा गुन्हा बडोद्यातील देसर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. त्यानंतर मुंबईत येऊन अजयकुमार छोटी - मोठी कामे करून पोट भरत होता. दादर येथील एका कपड्याच्या दुकानात तो काम करत असून नैराश्याने त्याने टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आज त्याने वरळी येथून वांद्रे येथे जाण्यासाठी टॅक्सी केली. वांद्रे - वरळी सी लिंकवर टॅक्सी मध्येच थांबवून तो समुद्रात उडी मारत असताना गार्डने त्याला अडविले. वरळी पोलिसांनी जखमी उजयकुमारला भाभा रुग्णालयात दाखल केले. तसेच या मुलाची माहिती काढत असताना या मुलाबाबत बडोद्यातील देंसर पोलीस ठाण्यात २०१७ साली मिसिंग तक्रार असल्याची माहिती मिळाली. या मुलाच्या पालकांना आम्ही संपर्क साधला असून ते त्याला घेऊन जातील, अशी माहिती वरपे यांनी दिली.

Scanned by CamScanner